14. The MFUCTO therefore calls upon the Government not to proceed with implementation of the new GR dated 19th July 2003 and the earlier GR dated 25th July 2002 but withdraw the same forthwith and replace them by a GR allowing recruitment of Lecturers in the Universities and Colleges on the basis of the provisions of the Maharashtra Universities Act, 1994, the existing statutes of the respective Universities made thereunder as also qualifications and pay scales laid down by the Central Government through the Union HRD Ministry and UGC and accepted by the Government of Maharashtra by GRs dated 13 th June 2000 and 18 th October 2001 as interpreted by the above-referred judgments delivered at the

*उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत येणाऱ्या शिक्षकीय रिक्त पदांच्या २/३ पदे केवळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने भरण्यावरील स्थगिती उठविण्याबाबत.*

**महाराष्ट्र शासन**

*शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१००२/(५५३/२००२)/आस्था-*
*उच्च व तंत्रशिक्षण विभाग : मंत्रालय विस्तार भवन,*
*मुंबई-४०० ०३२*

**दिनांक २४ सप्टेंबर २००३**

**वाचा** :- १. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक-बैठक-१००२/(९१/२००२)/आस्था-१ दिनांक २५.७.२००३

२. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग संकीर्ण-१००२/(५५३/२००२)/आस्था-१ दिनांक १९ जुलै, २००३

**शासन निर्णय** :- उपरोक्त संदर्भीत दिनांक १९.७.२००३ च्या शासन निर्णयाअन्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागांर्तगत येणाऱ्या शिक्षकीय पदांच्या २/३ पदे केवळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने भरण्यावरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

२. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. १ मध्ये कला संचालनालयाच्या खालील तक्ता क्रमांक १ ऐवजी तक्ता क्रमांक २ प्रमाणे वाचावे.

**तक्ता क्रमांक १**

| अ.क्र. | पद | एकत्रित मासिक वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | अधिव्याख्याता | ८,०००/- |
| २. | सहाय्यक अधिव्याख्याता | ५,५००/- |

**तक्ता क्रमांक २**

| अ.क्र. | पद | एकत्रित मासिक वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | अधिव्याख्याता (शासकीय कला संस्था) | ८,०००/- |
| २. | अधिव्याख्याता (शासकीय अनुदानित संस्था) | ७,०००/- |
| ३. | सहाय्यक अधिव्याख्याता (शासकीय अनुदानित संस्था) | ५,०००/- |

३. तसेच कला संचालनालयांतर्गत शासकीय कला संस्थामधील शिक्षकीय पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रणाणे निवडसमिती नेमण्यात यावी.

१. कला संचालक - अध्यक्ष
२. विषयतज्ञ - सदस्य (दोन)
३. शिक्षक संवर्गातील मागासवर्गीय प्रतिनिधी - सदस्य
४. शिक्षक संवर्गातील महिला प्रतिनिधी - सदस्य

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(पू.सि. मालवणकर)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

Hon'ble High Court Bench at Aurangabad and Mumbai."

*Note :- The above proposal will be placed before the General Body by Prof. A.W.Dhage, on behalf of the Executive Committee.*

**विषय क्रमांक ३५१ :**

***नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या प्रकाशनाबाबतचा अहवाल***

नुटा बुलेटीन रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशनाच्या कार्यपूर्तीबाबतचा पुढील **अहवाल विचारात घेणे व सम्मत करणे.** :-

**अहवाल**

(१) आमसभेने आपल्या रविवार, दिनांक ११ नोव्हेंबर २००१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय क्रमांक २९७ अन्वये सम्मत केलेल्या अहवालाच्या परिच्छेद ६ नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेतले होते.:- (अ) "नुटा बुलेटीन : रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका : विशेषांक पहिला," विशेषांक दुसरा, विशेषांक तिसरा या क्रमाने सन २००१ मधील एकामागून एकच्या पृष्ठ क्रमांकानुसार हे अंक प्रकाशित करण्यात यावेत. (ब) विधान परिषदेतील निवडक चर्चेची अधिकृत प्रतिवेदने प्रकाशित करतांना "नुटा बुलेटीन : रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका : शब्दयुद्ध विशेषांक : भाग १," भाग २, भाग ३ या क्रमाने स्वतंत्र संकलन म्हणून या विशेषांकांना सुद्धा सन २००१ च्या

## *निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनावरील महागाई वाढ : थकबाकीच्या रकमा प्रदान करणेबाबत.*

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग : शासन निर्णय क्रमांक : निमवा-१००३/२१०/सेवा-४,***

**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, : दिनांक : १६ ऑक्टोबर २००३**

***निर्णय***

राज्य शासकीय निवृत्तीवेतनधार/कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : निमवा १००३/१२६/सेवा-४, दिनांक १४ ऑगस्ट २००३ अन्वये १ ऑगस्ट २००३ पासून केंद्रशासनाच्या सूत्रानुसार दरमहा मूळ निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनावर ५५ टक्के या दराने महागाई वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना १ ऑगस्ट २००३ पूर्वीच्या कालावधीची निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनावरील महागाई वाढीची थकबाकी मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना त्यांच्या मूळ निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनावर खालील तक्त्यात दर्शविलेल्या सुधारित दराने महागाई वाढीच्या थकबाकीच्या रकमा मंजूर करण्यात याव्यात. :-

| अ.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा मासिक दर | |
|---|---|---|---|
| | | विद्यमान (टक्के) | सुधारित |
| १. | १ जानेवारी २००२ ते ३१ मार्च २००२ पर्यंत (३ महिने) | ४१.५ | ४३.५ |
| २. | १ एप्रिल २००२ ते ३० जून २००२ पर्यंत (३ महिने) | ४४.५ | ४६.२५ |
| ३. | १ जुलै २००२ ते ३१ डिसेंबर २००२ (६ महिने) | ४४.५ | ४८.५ |
| ४. | १ जानेवारी २००३ ते ३१ मार्च २००३ पर्यंत (३ महिने) | ४४.५ | ५०.७५ |
| ५. | १ एप्रिल २००३ ते ३१ जुलै २००३ (४ महिने) | ४४.५ | ५५ |

२. शासन असाही आदेश देत आहे की, राज्य शासनाने यापूर्वी (i) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : सेनिवे १००२/१/सेवा-४, दिनांक १३ जानेवारी २००२ व (ii) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : निमवा १००२/१३६/सेवा-४, दिनांक १८ मे २००२ अन्वये अनुक्रमे ४१.५ टक्के व ४४.५ टक्के या दराने दिनांक १ ऑक्टोबर २००१ ते ३१ मार्च २००२ व १ एप्रिल २००२ ते ३१ जुलै २००३ या कालावधीत मंजूर केलेल्या महागाई वाढीच्या रकमा, आता वरील सुधारित दराने देय ठरणाऱ्या महागाई वाढींच्या रकमांशी समायोजित करण्यात याव्यात व उर्वरित अनुज्ञेय असलेली सुधारित दराच्या महागाई वाढीच्या थकबाकीची रक्कम अदा करण्यात यावी.

३. रुपयाच्या अपूर्णांकात असलेली महागाई वाढीची रक्कम पुढील रुपयात पूर्णांकित करावी.

४. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

५. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारासह, लागू राहील.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहतील.

७. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १०९९/३०६/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद-१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने निवृत्तीवेतनावरील महागाई वाढीची थकबाकी अनुज्ञेय राहील.

८. या संबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षातर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

९. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, योग्य त्या फेरफारांसह, आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

१०. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त वा. चौधरी,**
शासनाचे उपसचिव.

For previous references see page 80 & 81 of 2003 NUTA Bulletin

नुटा बुलेटीनचेच पृष्ठ क्रमांक देण्यात यावेत. (क) संकलन सुविधा व पृष्ठ क्रमांकाची संदर्भ सुलभता लक्षात घेवून यापुढे एका मागून एक प्रकाशित होणाऱ्या या सर्व अंकांना सन २००१ च्या नुटा बुलेटीनचे पृष्ठ क्रमांक देण्यात येतील. (जरी ते प्रत्यक्ष पुढील वर्षात प्रकाशित करण्यात आले तरी) पृष्ठ क्रमांक जरी २००१ च्या नुटा बुलेटीनचे देण्यात आले तरी अंक प्रकाशित केल्याची तारीख व तो पोस्टात टाकल्याची तारीख मात्र प्रत्यक्षात जी असेल तीच असावी.

(२) नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या संदर्भात उपरोक्त महत्वपूर्ण निर्णय सन २००१ च्या बैठकीत आमसभेने घेतल्यानंतर याबाबतच्या पृष्ठ क्रमांकांच्या योजनेचे नियोजन करण्यात आले. या नियोजनानुसार सन २००१ च्या नियमित नुटा बुलेटीनच्या प्रकाशनासाठी पृष्ठ क्रमांक १ ते ११२ राखून ठेवण्यात आलेत. पृष्ठ ११३ पासून तर पृष्ठ क्रमांक ६०० पर्यंतची पृष्ठे (सन २००१ चे नुटा बुलेटीन) विशेषांकांसाठी राखून ठेवावी असा निर्णय घेण्यात आला. ६०१ च्या पुढील पृष्ठ क्रमांक (सन २००१ चे नुटा बुलेटीन) हे शब्द युध्द विशेषांकाना द्यावे असे ठरले.

(३) रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या प्रकाशनातील विशेषांकाच्या प्रकाशनाबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली. :- विशेषांक पहिला : दिनांक १५ ऑक्टोबर, २००१ रोजी "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ - विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक दुसरा : दिनांक १५ नोव्हेंबर, २००१ रोजी "नुटा बुलेटीन' (१९७६ ते २०००) अनुक्रमणिका - विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक तिसरा : दिनांक १५ नोव्हेंबर, २००१ रोजी "शिक्षणाचे वाटोळेकरण - विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक चौथा : दिनांक १५ फेब्रुवारी, २००२ रोजी "नेट/सेट - विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक पाचवा : दिनांक १ ऑगस्ट, २००२ रोजी "वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सुविधा विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक सहावा : दिनांक १५ ऑक्टोबर, २००२ रोजी "सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक सातवा : दिनांक १५ नोव्हेंबर, २००२ रोजी "रजा प्रवास सवलत विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक आठवा : दिनांक १ फेब्रुवारी, २००३ रोजी "वेतन अनुदान व्यवस्था विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक नववा : दिनांक १ जुलै, २००३ रोजी "संघटना - संस्थापना विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक दहावा : दिनांक १ सप्टेंबर, २००३ रोजी "महत्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला. विशेषांक अकरावा : दिनांक १५ सप्टेंबर, २००३ रोजी "नेट/सेट (दुसरा) विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात आला.

(४) नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी प्रकाशनातील शब्द-युद्ध विशेषांक (संघटनेच्या अध्यक्षांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विधानपरिषद सदस्य या नात्याने विधानपरिषदेत घडवून आणलेल्या चर्चेवरील, उपस्थित केलेल्या प्रश्नांवरील, कार्यवाहीची निवडक अधिकृत प्रतिवेदने समाविष्ट असलेल्या) मालिकेच्या प्रकाशनाबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली. :- शब्द-युद्ध विशेषांक : भाग एक : दिनांक १५ डिसेंबर, २००१ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग दोन : दिनांक १ मार्च, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग तीन : दिनांक १५ ऑगस्ट, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग चार : दिनांक १५ सप्टेंबर, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग पाच : दिनांक १ ऑक्टोबर, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग सहा : दिनांक १ नोव्हेंबर, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग सात : दिनांक १ मार्च, २००३ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग आठ : दिनांक १५ जुन, २००३ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग नऊ : दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्द-युद्ध विशेषांक : भाग दहा : दिनांक १५ ऑगस्ट, २००३ रोजी प्रकाशित करण्यात आला.

(५) पुढे करावयाच्या कार्यवाहीबाबत असे नमुद करण्यात येते की शब्द-युद्ध विशेषांकांचे पुढील भाग व त्यानंतर अनुक्रमणिका देऊन शब्द युद्ध विशेषांक मालिकेचे कामसुद्धा संपुष्टात येईल.

(६) हे काम संपुष्टात आल्याबरोबर या सर्व विशेषांकातील मजकूर व त्यासोबतच सन १९९५ ते सन २००३ पर्यंतचा नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्यात आलेला सर्व मजकूर समाविष्ट असलेली संगणकिय सी.डी. प्रत्येक जिल्हा युनिटला उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात येते.

*Note :- The above report will be placed before the General Body by Prof. A.G.Somavanshi, on behalf of the Executive Committee.*

## विषय क्रमांक ३५२ :

### *वेतनेत्तर अनुदानाचा नवा शासन निर्णय*

वेतनेत्तर अनुदानाविषयी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला २३ सप्टेंबर २००३ चा पुढील शासन निर्णय विचारात घेणे :-

*"अकृषि विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत...*

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**

**शासन निर्णय, क्रमांक एनजीसी २००३/(३५४/०३)/मशी-३,**

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,**

**दिनांक : २३ सप्टेंबर, २००३**

संदर्भ : १) शासन निर्णय, शिक्षण सेवायोजन आणि युवक सेवा विभाग, क्रमांक एनजीसी १२७९/१५७७९६-XXV, दिनांक ३.१०.१९७९.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक बीयूसी १०८८/२०२९/मशि-३, दिनांक १०.१.१९९६.

**शासन निर्णय :**

अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये अनुदान योजना लागू केली आहे. शासन निर्णय, दिनांक ३.१०.१९७९ अन्वये लागू केलेल्या वेतनेत्तर अनुदान सूत्रात बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. आता अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनाकडून महाविद्यालयाला जे वेतन अनुदान दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के इतका निधी वेतनेत्तर अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११८३/सेवा-५, दिनांक २६.८.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(अं.अ. कारखानीस)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन"

## विषय क्रमांक ३५३ :

### *आचार्य पदवीधारकांच्या शोध प्रबंधाचा विषय, शोध कर्त्याचे नाव, पत्ता, मार्गदर्शकाचे नांव, पत्ता नुटा बुलेटीनमध्ये क्रमशः प्रकाशित करणे*

प्रा. रा.बा.देवरकर हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

आज ज्ञानाच्या कक्षा इतक्या विस्तारित झाल्या आहेत की, २-४ वर्षापूर्वी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्राध्यापकाला ते ज्या वर्गाला शिकवितात ते त्यांना तयारी केल्याशिवाय शिकविणे शक्य होत नाही व त्यांच्या प्रतिपादनात अनेक त्रुटी राहतात. त्यामुळे वर्गातील हुशार विद्यार्थी मागे पडतात, करिता प्राध्यापकांना त्याच्या ज्ञानकक्षा अद्यावत राखण्याकरीता स्वाध्यायाची गरज वाटते. ते स्वाध्याय त्याना जर शोध कार्याकडे मार्गस्त केल्यास उपयोगी ठरु शकतो. करिता शोधकर्त्यांची नावे त्यांच्या विभागासह व मार्गदर्शकासह पत्ता देवून क्रमशः प्रकाशित करण्यास हरकत नसावी, जेणे करुन शोधकर्त्याला त्यांच्याशी संपर्क साधता येईल.

******

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**( Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended (a) by leaving out a word or words or (b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or (c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

## (२)

# मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांना केंद्रिय प्राथमिक शिक्षकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे

*तिसरे अधिवेशन २००३ : बुधवार, दिनांक १६ जुलै २००३ : महाराष्ट्र विधानपरिषद*

३३५७१ **श्री. वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी,एल.अैनापूरे, नातिकोद्दीन खतिब** : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३७५ ला दिनांक १२ मार्च २००३ रोजी दिलेल्या उत्तरात्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांच्या वेतनश्रेणी निश्चित करतांना निर्माण झालेले दोष दुरुस्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकासमंत्रालयाने दिनांक ४ एप्रिल २००२ रोजी एक शासननिर्णय (क्रमांक इ-५-२१/९७-यु.टी.) निर्गमित करुन कारवाई केली असल्याचे लक्षात आणून देऊन तत्सम दोष दुरुस्तीचा शासननिर्णय महाराष्ट्र शासनाने त्वरित निर्गमित करावा, अशी मागणी करणारे जे निवेदन विभागीय कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा. शालेय शिक्षणमंत्री यांना ९ जानेवारी २००३ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले त्यासंदर्भातील केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रत प्राप्त करुन घेण्याची कारवाई पूर्ण झाली हे खरे आहे काय?

२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे?

३) कारवाई केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेंद्र शिंगणे, श्री. अमरिशभाई पटेल यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) केंद्र शासनाच्या मूळ शासन निर्णयाची प्रत अद्याप शासनास प्राप्त झालेली नाही. यास्तव केंद्र शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री. वसंतराव खोटरे** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी जे उत्तर शासनाकडून आलेले आहे ते बरोबर नाही. कारण आज महाराष्ट्र राज्यामध्ये जवळपास ३ लाख मिडलस्कुल शिक्षक आहेत आणि केंद्र सरकारने त्यांच्या बाबत वरिष्ठ श्रेणीचा जी.आर.काढलेला आहे. आता या उत्तरात असे म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या जी.आर.ची मूळ प्रत अद्याप मिळालेली नाही. आता या गोष्टीस देखील जवळपास ४ महिने झालेले आहेत. इतक्या कालावधीमध्ये शासनाला केंद्र सरकारच्या जी आर ची मूळ प्रत न मिळणे हे काही बरोबर नाही. म्हणून ही मूळ प्रत मिळण्यास आणखी आपल्याला किती काळ लागेल?

**श्री. राजेंद्र शिंगणे** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी उत्तरात जे सांगितले आहे ते बरोबर आहे. कारण या ठिकाणी मिडलस्कूल शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत केंद्र सरकारने सुधारित जीआर काढलेला

## (१)

# मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांना केंद्रिय प्राथमिक शिक्षकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे

*दुसरे अधिवेशन २००३ : बुधवार, दिनांक १२ मार्च २००३ : महाराष्ट्र विधानपरिषद*

(४) * ३०३७५. **श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे** : सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांच्या वेतनश्रेणी निश्चित करतांना निर्माण झालेले दोष दुरुस्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दिनांक ४ एप्रिल २००२ रोजी शासननिर्णय क्रमांक इ-५-२१/९७-यु.टी. निर्गमित करून कारवाई केली असल्याचे लक्षात आणून देऊन तत्सम दोष दुरुस्तीचा शासननिर्णय महाराष्ट्र शासनाने त्वरित निर्गमित करावा, अशी मागणी करणारे एक निवेदन विभागीय कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा.शालेय शिक्षणमंत्री यांना जानेवारी २००३ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे;

(३) कारवाई केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अमरिश पटेल** : (१) विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांचे दिनांक ९ जानेवारी २००३ चे निवेदन प्राप्त झाले आहे. **मात्र त्यासोबत केंद्र शासनाच्या शासन निर्णयाची प्रत प्राप्त झालेली नाही.**

(२) केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रत प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, आपल्या निर्णयासाठीच हा हरकतीचा मुद्दा मी उपस्थित करीत आहे. हा पध्दतीचा आणि व्यवस्थेचा प्रश्न आहे. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत अ.क्र. ४ वर जो ३०३७५ क्रमांकाचा तारांकित प्रश्न आहे, त्याच्या प्रश्न भाग १ ला उत्तर असे दिले आहे की, "**विभागीय कार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांचे दिनांक ९ जानेवारी २००३ चे निवेदन प्राप्त झाले आहे. मात्र त्यासोबत केंद्र शासनाच्या शासन निर्णयाची प्रत प्राप्त झालेली नाही.**" केंद्र शासनाचा निर्णय आणि तारीख निवेदनात दिली आहे, मध्यवर्ती सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा निर्णय आणि ४ एप्रिल २००२ ही त्याची तारिख दिली आहे, समजा राज्य शासनाचा किंवा केंद्र शासनाचा शासन निर्णय आणि तारिख दिली आहे. परंतु निवेदनकर्त्यांनी तो शासन निर्णय द्यावा, अशी अपेक्षा करणे चूक आहे. माझ्याजवळ केंद्राच्या निर्णयाची प्रत आहे. प्रश्नात जी तारीख दिली आहे, तसेच जो नंबर दिला आहे, तो बिनचूक आहे. आता शासनाच्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे उत्तर देणे हे बरोबर आहे काय ? आता हा सगळा निर्णय निवेदनाकर्त्यांनी सोबत जोडावा अशी अपेक्षा बरोबर आहे काय? सरकारी डॉक्युमेंट, केंद्राचा किंवा राज्य शासनाचा शासन निर्णय, उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या सारखे पब्लिक डाक्युमेंट हे निवेदनासोबत निवेदनकर्त्याला जोडा असे म्हणणे कितपत योग्य आहे ? Publicly identifiable Govt. document तारिख व नंबरसह दिले. निवेदनकर्त्यांनी या बाबतचा संदर्भ बिनचूक दिला आहे, परंतु तो शासननिर्णय सोबत जोडलेला नाही. त्यांचे निवेदन आमच्याकडेही आले आहे. मध्यवर्ती सरकार ही मोठी ऑर्गनायझेशन आहे.आता आम्हाला तो संपूर्ण निर्णय मिळतो आणि राज्य सरकारला तो केंद्राचा शासननिर्णय मिळत नाही, हे काही बरोबर नाही. आम्हाला या हरकतीच्या मुद्याबाबत माननीय सभापतींनी निर्णय द्यावा अशी माझी विनंती आहे. माझा या बाबत कोणताही उपप्रश्न नाही.

**सभापती** : माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. **ज्यांनी प्रश्न मांडावयाचा, ज्यांनी निवेदन करावयाचे, त्यांनी निर्णयाची प्रत जोडली पाहिजे असे म्हणणे बरोबर नाही.** राज्य सरकारला केंद्र सरकारचा निर्णय प्राप्त करुन घेता येत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. अशा प्रकारची भूमिका प्रशासनाने घेणे हे बरोबर नाही. महाराष्ट्र शासनाला, केंद्र शासनाचा एखादा अध्यादेश, एखादा निर्णय, एखादे परिपत्रक हे मिळविता येऊ नये ? **सदस्यांना तो निर्णय मिळतो. परंतु प्रशासनाला तो निर्णय मिळत नाही, हे बरोबर नाही. अशा प्रकारची भूमिका घेणे हे बिलकूल उचित नाही. अशा प्रकारची भूमिका प्रशासनाने घेऊ नये.**

******

आहे. त्याची प्रत आपल्याला, राज्य सरकारला अजून मिळालेली नाही. या संदर्भात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मा. शालेय शिक्षणमंत्र्यांना पत्र पाठवून केंद्राच्या निर्णयाची प्रत मिळाली आहे काय? वा त्याबाबत आपण काय करणार आहात? असा प्रश्न विचारला आहे. त्या निवेदनासोबत केंद्राच्या जीआरची झेरॉक्स प्रत देखील त्यांनी जोडली आहे. पण सदर जीआरची मूळ प्रत मिळविण्यासाठी राज्य सरकारकडून केंद्राकडे पाठपुरावा आम्ही करीत आहोत.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हा विचारता सोय नाही एवढ्या कौतुकाचा विषय झाला आहे की, गेल्या वेळेस याच प्रश्नाबाबत सभागृहामध्ये सरकारने उत्तर दिले आहे की, "विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांचेकडून निवेदन प्राप्त झालेले आहे. मात्र त्यासोबत केंद्र सरकारच्या निर्णयाची प्रत प्राप्त झालेली नाही." अध्यक्ष महाराज, त्यावेळी या संबंधात आपण रुलिंग दिले होते की, "केंद्र सरकारच्या निर्णयाची, परिपत्रकाची प्रत सदस्यांना मिळते आणि प्रशासनाला मिळत नाही हे बरोबर नाही आणि अशी भूमिका प्रशासनाने घेऊ नये." तरीही यांनी निवेदनकर्त्यांना पत्र पाठविले की, "केंद्र सरकारच्या ज्या पत्राचा आपण उल्लेख केला आहे ते पत्र विभागास प्राप्त झालेले नसल्यामुळे ते प्राप्त करून द्यावे." अध्यक्ष महाराज, हे पत्र महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिवांनी लिहिलेले आहे, अर्थात आपण निर्णय देण्यापूर्वी म्हणजे २५.२.२००३ रोजी पाठविलेले ते पत्र आहे. त्यानंतर निवेदन कर्त्यांनी ९ एप्रिल, २००३ रोजी रजिस्टर पोस्टाने केंद्र शासनाच्या मूळ निर्णयाची प्रत विभागाला पाठवून दिली आहे. त्यावर देखील आता हे उत्तर येथे दिले गेलेले आहे. याला काय म्हणावे ? मला हे कळत नाही की, शिक्षण खात्याचे अधिकारी तुमची फजिती करण्यासाठी काम करीत आहेत की, तुम्हाला मदत करण्यासाठी काम करताहेत. केंद्र सरकार चंद्रावर आहे काय ? निवेदनकर्त्याने तुमच्याकडे केंद्र शासनाच्या मूळ जीआर ची प्रत पाठविली आहे. त्याच मूळ जीआरची प्रत त्यांनी आम्हालाही पाठविली आहे. आमच्याकडे आहे आणि तुमच्याजवळ - पण आहे. शासनाजवळ नाही असे म्हणणे हे उचित नाही. म्हणून त्या अधिकाऱ्यावर आपण प्रथमतः कारवाई करा की जे तुम्हाला अशा प्रकारची माहीती देतात. केंद्र सरकारचा जी.आर. तुम्हाला अजून ६-७ महिने झाले तरी मिळत नाही हे काही बरोबर नाही. तो मिळण्यासाठी आपण काय करणार आहात?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** या बाबत महाराष्ट्र शासनाने २५ फेब्रुवारी २००३ रोजी एक पत्र केंद्र शासनाला पाठविले आहे. त्याचबरोबर जुलै २००३ ला एक पत्र पाठविले आहे. या ठिकाणी हा जो निर्णय झाला आहे, त्याची एक प्रत शासनाकडे पाठवावी, असा दोनदा पत्रव्यवहार आम्ही केला आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** आपणाकडें केंद्र शासनाच्या त्या निर्णयाची निवेदनकर्त्यांनी पाठविलेली सत्यप्रत नाही काय ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** विदर्भ माध्यमिक संघाने आमच्याकडे या बाबतची झेरॉक्स प्रत दिलेली आहे. झेरॉक्स प्रतीवर आपण कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. ओरीजीनल प्रत जोपर्यन्त आपणाकडे प्राप्त होत नाही, तोपर्यन्त आपण या बाबतचा निर्णय घेऊ शकत नाही.

( गोंधळ )

**सभापती :** झेरॉक्स प्रतीवर आपण १०० टक्के विश्वास ठेवीत नाही, हे बरोबर आहे. गेल्यावेळी मला आश्चर्य वाटले होते. त्यापेक्षा आता मला महद्आश्चर्य वाटत आहे. आता आश्चर्याचे रुपांतर महद्आश्चर्यात झाले आहे. केंद्र शासनाची एक प्रत याच देशातील एका राज्य सरकारला मिळत नाही. आता पत्र पाठवून होत नसेल तर सचिवांना दिल्लीला जाऊन येऊ द्या. मा. मंत्रिमहोदय जर दिल्लीला गेले असतील तर त्यांनी ती प्रत आणावयास पाहिजे होती. त्यामध्ये काय बिघडले ?

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, त्यामुळे हा प्रश्न येथेच थांबवावा.पुढच्या बुधवारी हा प्रश्न पुन्हा घ्यावा. पुढच्या बुधवारपर्यंत शासनाला प्रत मिळू शकते काय तेही कळेल.

**सभापती :** दळणवळणाची साधने अद्ययावत झाली आहेत. त्यामुळे येथून या बाबतची विचारणा करावयाला आणि याची प्रत केंद्र शासनाने तेथून पाठवावयाला काय हरकत आहे ? ही प्रत याप्रमाणे दोन मिनिटात या सरकारकडे यावयाला काय हरकत आहे ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, आम्ही माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेतलेल्या आहेत.

( गोंधळ )

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, हा भावना लक्षात घेण्याचा प्रश्न नाही. ६ महिने केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रत तुम्हाला मिळत नाही त्यामुळे हा प्रश्न आपण राखून ठेवावा.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, या बाबत केंद्र शासनाने निर्णय घेतलेला आहे. केंद्रीय शाळा व केंद्रशासित प्रदेशातील शाळेतील शिक्षकांना हा निर्णय लागू असल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय अद्याप त्यांनी महाराष्ट्र शासनाला कळविला नाही.

**श्री. बी. टी. देशमुख :** याचा अर्थ निर्णय झालेला आहे ना ?

( गोंधळ )

**श्री. राजेंद्र शिंगणे :** विदर्भ माध्यमिक संघातर्फे महाराष्ट्र शासनाला या बाबतची एक झेरॉक्स कॉपी दिली आहे. त्या संदर्भावरुन आम्ही या बाबतची माहिती घेतली आहे.

( गोंधळ )

**सभापती :** मा. मंत्रिमहोदयांना प्रथम बोलू द्यावे.

**श्री. बी. टी. देशमुख :** आम्ही त्यांचे उत्तर ऐकले आहे. त्यावरुन प्रतिकुल उत्तर देण्यापूरता केंद्र शासनाचा निर्णय त्यांना मिळालेला आहे, असेही उत्तर मिळते आणि अनुकुल उत्तर हवे असेल तर त्यांना निर्णय मिळालेला नाही, असेही उत्तर मिळते.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, मी या बाबत अगोदरच सांगितले आहे. या बाबत आपण जे निवेदन शासनाला दिले होते, त्यासोबत आपल्याजवळ जी प्रत होती, ती प्रतही आपण शासनाला दिली आहे. आता त्या प्रतीचा अभ्यास केला तर असे दिसून येत आहे की, हा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय आहे. केंद्रशासित प्रदेशासाठी घेतलेला हा निर्णय आहे. त्यांनी केंद्रातील कर्मचा-यांसाठी घेतलेला हा निर्णय आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील शिक्षकांना हा निर्णय लागू करण्याचा प्रश्नच येत नाही. आणि त्यामुळेच त्यांनी आपल्याला हा निर्णय कळविलेला नाही.

**सभापती :** म्हणजे तो निर्णय महाराष्ट्र राज्याला लागू होणार नाही, असे आहे काय ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** या प्रतीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येत आहे की, महाराष्ट्रातील आपल्या शिक्षकांना तो लागू होणार नाही.

( गोंधळ )

**श्री. बी. टी. देशमुख :** या ठिकाणी केंद्र शासनाच्या मेरीटवर जर चर्चा होणार असेल तर मला या बाबतचे दुसरेही काही मुद्दे या ठिकाणी मांडावे लागतील. केंद्र शासनाच्या निर्णयाबाबत चर्चा सुरु करणार आहोत आणि चर्चा आपण सुरु करणार नाही, असे दूहेरी चालणार नाही. तुम्हाला जर निर्णय मिळाला असेल,ती खरी प्रत आहे याबाबत तुमची खात्री झाली असेल तर त्या बाबतची चर्चा आम्ही सुरु करतो. आता आपल्याला केंद्राचा निर्णय मिळाला नसेल असे आपले म्हणणे असेल तर चर्चेचा प्रश्नच नाही. आम्ही त्याप्रमाणे मा. सभापतींना विनंती केली आहे की, प्रश्न राखून ठेवावा या बाबतची चर्चा आपण पुढच्या बुधवारी करु. परंतु असे न होता,म्हटले तर केंद्राचा निर्णय मिळाला, म्हटले तर नाही मिळाला. त्या निर्णयाच्या गुणवत्तेवर चर्चा होणार असेल तर आम्ही त्यावर चर्चा करण्यासाठी तयार आहोत.

**सभापती :** केंद्र सरकारचा जो मूळ निर्णय आहे, तो मूळ निर्णय मा. मंत्रिमहोदय किती दिवसात उपलब्ध करु शकतील ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** या बाबतची मूळ प्रत किती दिवसात प्राप्त करुन घेऊ, हे मला आताच सांगता येणार नाही.

( गोंघळ )

**सभापती :** आठ दिवसात निर्णय मिळण्यामध्ये कोणती अडचण आहे.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** आठ दिवसाच्या आत हा निर्णय आम्ही प्राप्त करुन घेऊ.

( गोंधळ )

**सभापती :** हा प्रश्न गेल्या अधिवेशनातील आहे. त्याचे उत्तर आणि त्याबाबतची मूळ प्रत अजून मिळत नाही. आता आठ दिवसाच्या आत याची प्रत आपण मिळविणार आहांत. त्यामुळे आठ दिवसानंतर हा प्रश्न घेण्यात येईल.

******

(३)

# मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांना केंद्रिय प्राथमिक शिक्षकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करणे

*तिसरे अधिवेशन २००३ : बुधवार, दिनांक २३ जुलै २००३ : महाराष्ट्र विधानपरिषद*

*दिनांक १६.७.२००३ रोजी राखून ठेवलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ३३५७१ चे सुधारित उत्तर*

३३५७१ **श्री. वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी,एल.अैनापूरे, नातिकोद्दीन खतिव** : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३७५ ला दिनांक १२ मार्च २००३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मिडलस्कुल (डी.एड.) शिक्षकांच्या वेतनश्रेणी निश्चित करतांना निर्माण झालेले दोष दुरुस्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकासमंत्रालयाने दिनांक ४ एप्रिल २००२ रोजी एक शासननिर्णय (क्रमांक इ-५-२१/९७-यु.टी.) निर्गमित करुन कारवाई केली असल्याचे लक्षात आणून देऊन तत्सम दोष दुरुस्तीचा शासननिर्णय महाराष्ट्र शासनाने त्वरित निर्गमित करावा, अशी मागणी करणारे जे निवेदन विभागीय कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा. शालेय शिक्षणमंत्री यांना ९ जानेवारी २००३ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले त्यासंदर्भातील केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रत प्राप्त करुन घेण्याची कारवाई पूर्ण झाली हे खरे आहे काय?

२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे?

३) कारवाई केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमरिश पटेल शालेय शिक्षण मंत्री** : (१) होय

(२) व (३) केंद्र शासनाच्या मूळ शासन पत्राची प्रत प्राप्त करुन घेण्यात आली असून **केंद्र शासनाच्या सदरील पत्राचे अवलोकन केले असता, केंद्र शासनाच्या केंद्रिय प्राथमिक (मिडलस्कूल) शिक्षकांना देण्यात आलेली वाढीव वरिष्ठ व निवडश्रेणी ही फक्त केंद्र शासित प्रदेशातील व केंद्र शासन पुरस्कृत स्वायत्त संस्थेतील प्राथमिक शिक्षकांनाच वाढवून देण्यात आल्याचे दिसून येते.** तथापि, राज्यातील मिडलस्कूल शिक्षकांना सदरील वेतनश्रेणी लागू करता येईल किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.

**श्री. वसंतराव खोटरेः** सभापती महोदय, या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे असे माझे म्हणणे आहे. विभागीय कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना ९जानेवारी,२००३ रोजी पाठविले त्या संदर्भातील प्राप्त झालेली केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रत आणि केंद्र शासनाच्या मूळ शासन पत्राची प्रत यामध्ये काय फरक आहे? दोन्ही प्रती एकच आहे की, वेगवेगळया आहेत?

**श्री अमरिश पटेल** : सभापती महोदय, या दोन्ही प्रती सारख्याच आहेत.

**श्री.बी.टी.देशमुखः** सभापती महोदय, तसे आहे तर मग यावर माझा प्रश्न आहे. यामध्ये प्रश्न भाग ३ ला उत्तर असे दिले आहे की, "केंद्र शासनाच्या केंद्रिय प्राथमिक (मिडलस्कुल) शिक्षकांना देण्यात आलेली वाढीव वरिष्ठ व निवड श्रेणी ही फक्त केंद्र शासित प्रदेशातील व केंद्र शासन पुरस्कृत स्वायत्त संस्थेतील प्राथमिक शिक्षकानांच वाढवून देण्यात आल्याचे दिसून येते." म्हणजे आपले शिक्षण खाते आहे, त्यामधील कोणीही अधिकारी हे वाचायला सुध्दा तयार नाहीत. विभागीय कार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांचे ९ जानेवारी २००३ चे निवेदन मिळाले काय? याला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या निवेदनासोबत रेल्वेतील शिक्षकांना हे लागू केल्याची कॉपी जोडलेली आहे काय? That copy is issued by the Govt. of India, Ministry of Railways, Railway Board and the number is : E (P.&A)-2002/PS-5/PE-3, dated 5.7.2002. यामध्ये केंद्र शासनाच्या रेल्वेमधील शिक्षकाना सुध्दा ते लागू केले आहे.खरे म्हणजे केंद्र शासनातील मानव संसाधन विभागाने ४.४.२००२ चा जी.आर.काढला आणि त्यामध्ये बाकीचे सगळे आले.परंतु मोहन पांढरकामे म्हणून जे अवर सचिव आहेत त्यांनी २५.२.२००३ ला पत्र लिहिले. कोणाला? तर निवेदनकर्त्यांना की, भारत सरकारच्या निर्णयाच्या प्रती तुम्ही पाठविल्या नाही. निवेदन कर्त्यांनी ९.४.२००३ ला तीन निर्णयाच्या प्रती पाठविल्या आहेत आणि असे असताना प्रश्न क्रमांक एक ला 'होय' उत्तर देण्यात आले आहे तेव्हा या संदर्भात आपले काय म्हणणे आहे ते आपण सांगावे.

**श्री. अमरिश पटेल** :सभापती महोदय, केंद्र शासनाने जे पत्र पाठविले त्यामध्ये वेतन श्रेणी वेगवेगळया आहेत आणि आता वित्त विभागाकडे हा प्रश्न पाठवावा लागणार आहे. आता आम्ही हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविणार आहोत.

**श्री.बी.टी.देशमुखः** माझा प्रश्न आपल्याला कळला नाही असे दिसते.मी शांतपणे आपल्याला प्रश्न विचारतो.आपण माझा प्रश्न नीट ऐकून घ्या . उत्तराच्या भाग ३ मध्ये असे विधान केलेले आहे की, "प्राथमिक शिक्षकांची जी वेतनश्रेणी आहे ही केंद्र शासित प्रदेशातील व केंद्र शासन पुरस्कृत स्वायत्त संस्थेतील प्राथमिक शिक्षकांना वाढवून देण्यात आल्याचे दिसून येत आहे." खरी गोष्ट अशी की, एच.आर.डी.ने ४ एप्रिल २००२ चा शासन निर्णय काढला आणि सर्व विभागांना तो लागू केला. त्याप्रमाणे. त्या त्या विभागांनी ती सुधारित वेतनश्रेणी लागू केली. निवेदनकर्त्यांनी आपल्या पहिल्या ९ जानेवारी, २००३ च्या निवेदना सोबत रेल्वेचे दि.५.७.२००२ चे नोटिफिकेशन जोडलेले आहे काय? हा पहिला प्रश्न आणि दि. ९ एप्रिल,२००३ ला त्यांनी आपणास जे पत्र पाठविले त्यासोबत केंद्रीय विद्यालयामध्येसुध्दा हे लागू आहे, हा २३.१.२००३ चा जी.आर. त्यांनी सोबत जोडलेला आहे हे खरे आहे काय?

**श्री.अमरीश पटेलः** होय, दोन्ही जी.आर. सोबत जोडलेले आहेत.

**श्री. बी. टी. देशमुख** : मग हे वाक्य इथे भाग ३ च्या उत्तरात कसे आले? जर दोन्ही जी.आर. निवेदन कर्त्यांनी सोबत जोडलेले आहे असे आपण म्हणता तर मग "फक्त केंद्रशासित प्रदेशातील लोकांना आणि स्वायत्तसंस्थांना" हे वाक्य येथे तुमच्या उत्तरात भाग ३ मध्ये कसे आले?

**श्री. अमरीश पटेल** :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते बरोबर आहे. त्याप्रमाणे ते आलेले आहे, त्याबद्दल वाद नाही.

**श्री. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, त्याबद्दल जर वाद नाही तर हे वाक्य आले कसे? याबद्दल वाद राहाणार नाही काय? रेल्वेचा जी.आर. केंद्रिय विद्यालयांचा जी.आर. हे जर तुम्हाला मिळालेले आहेत तर मग ते वाक्य आले कसे? प्रश्न भाग ३ च्या उत्तरात? याचे उत्तर पाहिजे.

**श्री. अमरीश पटेल** : ते आपल्यालाही माहीत आहे की, ते पत्र आलेले आहे. आपल्याला वेतनश्रेणीबद्दल विचारावयाचे आहे ना?

**श्री. बी.टी.देशमुख** : वेतनश्रेणीचे बाजूला ठेवा. सभापती महोदय, मला सध्या गलथानपणाबद्दल विचारावयाचे आहे.तुम्हाला कॉपी मिळण्यासाठी दोन अधिवेशने गेली. आता या अधिवेशनामध्ये केंद्राच्या शासननिर्णयाची प्रत मिळण्याचा प्रश्न नाही. गलथानपणाचा प्रश्न आहे. त्या गलथानपणाच्या प्रश्नाला उत्तर यावे, एवढीच माझी अपेक्षा आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी तोच प्रश्न विचारतो.निवेदन कर्त्याकडून रेल्वेमध्ये सुध्दा ही वेतनश्रेणी लागू झालेली आहे हा जी.आर.शासनाला मिळालेला आहे, तसेच केंद्रीय संघटन विद्यालयामध्ये ती लागू झाली आहे ना? हाही जी.आर. मिळालेला आहे तर मग हे भाग ३ चे उत्तर आले कसे? याचे उत्तर द्या. चूक झाली म्हणाना! काय बिघडले? होते चुक अनेकदा.

**श्री. अमरीश पटेल** : सभापती महोदय, ती चूक झालेली आहे असे मी मान्य करतो.

**श्री. बी. टी. देशमुख** : चूक झाली आहे असे आपण म्हटल्यानंतर तो प्रश्न तेथे संपला. त्याचा कोणाला तरी अधिकारी वर्गामध्ये संकोच वाटेल अशी मी अपेक्षा करतो. आता पुढे चालु. उत्तर असे दिलेले आहे की, जणू काही हा परराष्ट्रातील व्यवहार आहे. तो व्यवहार आम्हाला येथे लागू नाही. ज्या अधिका-यांनी हे उत्तर तयार केले, त्यांना कोणाची वेतनश्रेणी लागू आहे? केंद्र सरकारचीच वेतनश्रेणी त्यांना सुध्दा लागू आहे. केंद्राच्या वेतनश्रेण्या येथे लागू करण्याच्या बाबतीत राज्य शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. डिसेंबर,७७ मधील तो पॉलिसी डिसीजन आहे. तो आज पर्यंत बदललेला नाही. आजही तो जसाच्यातसा आहे. अमलात आहे. तो निर्णय मी याठिकाणी वाचून दाखवितो. "राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरिता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग

नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतनआयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतनआयोगाच्या शिफारशीवरील केंद्र शासनाचे वेतनविषयक निर्णय 'Decisions of the Central Government on the Commission's recommendations in regard to pay scales.' राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील, वेतन निश्चितीचे सुत्र देखील केंद्र शासनाप्रमाणेच असेल." सभापती महोदय, हा निर्णय आणि हा आदेश आजही कायम आहे. मग त्या प्राथमिक शिक्षकांनीच शासनाचे काय घोडे मारले? केंद्राकडून मागाहून आलेल्या अनेक करेक्शन्स तुम्ही दुरुस्त केल्या. मंत्रिमहोदयांनी परवाही सभागृहात सांगितले की, हे केंद्राचे आहे. ही वेतनश्रेणी केंद्राचीच आहे. महाराष्ट्र शासनाकडे ते जी.आर. पाठवतील कशासाठी? आपण येथे ते लागू केल्यामुळे आपण तेथून त्यांचा जी. आर. आणला आणि तो लागू केला.फक्त या प्राथमिक शिक्षकांना या बाबतीत त्रास देणे हे बरोबर नाही. महाराष्ट्र शासनाचा उपरोक्त धोरणात्मक निर्णय मा.मंत्रिमहोदयांना माहीत आहे काय?

**श्री. अमरीश पटेल** : होय! मला माहीत आहे.

